६

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हीएलएस १०७९/सात (२८६१)
शिक्षण, रोजगार व युवक सेवा विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ১৬ ऑक्टोबर १९७९

प्रति,

शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय – साने गुरूजी प्राथमिक शाळा, पुणे,
या शाळेस अनुदान देण्याबाबत . . .

कृपया आपले वरील विषयाबाबतचे क्रमांक खाप्राशा१०७९/११३५२/१९-ड, दिनांक १०/१०/१९७९चे पत्र पहावे.

२ उपलब्ध माहितीवरून असे दिसते की, साने गुरूजी प्राथमिक शाळा, सिंहगड रस्ता, पुणे ही शाळा दिनांक७/६/१९७१ रोजी सुरू झाली. शाळा चालकांनी शाळेस मान्यता मिळावी याकरिता दिनांक २१/७/१९७१ रोजी संबंधितांकडे अर्ज केला. या अर्जास अनुसरून दिनांक १५/२/१९७२ रोजी शाळेची तपासणी झाली व या शाळेस मान्यता प्रदान करण्याची सर्व कार्यवाही पूर्ण होऊन शाळेस मान्यता प्रदान करणेचा ठराव दिनांक ३/४/१९७२ रोजी, म्हणजे १९७१-७२ हे आर्थिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर फक्त तीनच दिवसानंतर, झाला. म्हणजे या शाळेस मान्यता प्रदान करणेबाबत सर्व कार्यवाही १९७१-७२ सालीच पूर्ण झालेली होती. मात्र तांत्रिक दृष्ट्या मान्यता प्रदान करण्याचा ठराव फक्त सुमारे तीन दिवस उशिरा झाला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, या शाळेस, एक खास बाब म्हणून, १९७१-७२ सालीच मान्यता मिळाली आहे असे मानावे व तीस मान्यता खाजगी प्राथमिक शाळांसाठी असलेले अनुदानसूत्र लागू करावे, म्हणजेच या शाळेस अनुदानास पात्र समजावे, असे शासनाचे आदेश आहेत. या शाळेस चालूसाली म्हणजे १९७९-८० साली, तिच्या मागील वर्षातील म्हणजे १९७८-७९ मधील मान्य खर्चावर, सध्याच्या नियमाप्रमाणे अनुदान देण्यात यावे. हे अनुदान देण्याबाबत येणारा खर्च मान्य तरतूदीतून भागविण्यात यावा. शाळेस अनुदान देण्याबाबत जी कारवाई करण्यात येईल

ती यथावकाश शासनास कळवावी.

र.रा.धुमे

( र. रा. धुमे )
कार्यासन अधिकारी,

प्रत माहितीसाठी रवाना.

१) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना ( त्यांचे पत्र क्रमांक प्रा शि./अनुदान/पीआर, दिनांक २४/९/१९७९च्या संदर्भात)

२) शिक्षणाधिकारी, पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.